# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रिय उमेदवार,

१. जाहिरात क्र. ०५/२०१९, ०४/२०१९, ०६/२०१९ व ०१/२०१९ अंतर्गत आपण अनुक्रमे उपकेंद्र सहाय्यक, विद्युत सहाय्यक, पदविकाधारक शिकाऊ अभियंता (वितरण)/ (स्थापत्य) व पदवीधारक शिकाऊ अभियंता (स्थापत्य) या पदाकरीता कागदपत्रे तपासणी होण्याची आणि सदर पदावर कंपनीअंतर्गत नियुक्ती मिळण्याची उत्सुकतेने वाट पाहत आहात, याची आम्हास जाणीव आहे. त्याचप्रमाणे आम्हीदेखील तुम्हाला लवकरात लवकर नियुक्त करण्यास इच्छुक आहोत, कारण तुमच्या सेवा कंपनीस तात्काळ हव्या आहेत. तथापि, काही अपरिहार्य कारणांमुळे याबाबतची कार्यवाही करण्यास आम्ही सद्यस्थितीत असमर्थ आहोत.

२. तथापि, आम्ही आपणास खात्री देऊ इच्छितो की, वरील समस्यांचे निराकरण करण्याचा आम्ही सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहोत, जेणेकरुन प्रकरणपरत्वे कागदपत्रे तपासणी आणि/किंवा नियुक्ती देण्याचा मार्ग मोकळा होईल. आम्ही आशा करतो की, नजीकच्या काळात याबाबतची कार्यवाही पूर्ण होईल.

३. महावितरण कंपनी जी की भावी कर्मचाऱ्यांच्या अपेक्षांबाबत नेहमीच संवेदनशील आहे. सदरची नोकरी शक्य तेवढया लवकर मिळण्याची तुमची गरज आम्ही जाणतो, तसेच या प्रकरणी विलंब झाल्यामुळे तुमची आणि तुमच्या कुटुंबातील सदस्यांची चिंता आणि तुम्ही कोणत्या परिस्थितीतून जात आहात याचीही आम्हाला जाणीव आहे.

४. यास्तव, आम्ही आपणास विनंती करतो की, आपण आतापर्यंत संयम बाळगला आहे. त्याचप्रमाणे आणखी थोडा संयम बाळगावा, आणि आपल्या पालकांचा व वडीलधाऱ्या व्यक्तींचा योग्य सल्ला घ्या आणि असे कोणतेही कृत्य करु नका की ज्यामुळे आपल्या पोलीस पडताळणीस अथवा नियुक्तीस हानी पोहोचेल.

५. हा संदेश सर्व उमेवारांना आश्वासित करण्यासाठी तसेच त्यांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये याकरीता कंपनीच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात येत आहे.

SD/-

**दिनांक : ०१/११/२०२०** **मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*****